आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN
Digital TV & Broadband Services

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक
निडर निर्भिड
जनसंचलन
City NEWS
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ५११ मंगळवार दि १७ नोव्हेंबर २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्याच्या नियमबाह्य पदोन्नतीची चौकशी रखडली?

## तक्रारदाराचा थेट आरोप;भ्रष्टाचार,खोटे अहवाल आणि शासनाची दिशाभूल!

**जनसंचलन-बुलढाणा**

सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्याच्या नियमबाह्य पदोन्नतीची चौकशी रखडल्या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने काढलेल्या आदेशानंतरही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, हे प्रकरण फक्त एका पदोन्नतीचं नाही,तर अनोदनिकृत फेरफार,शासनाचा बुडविलेला लाखो रुपयांचा महसूल,नियमबाह्य पदोन्नती खोटे विवरण/अहवाल शासनाची दिशाभूल या नियमबाह्य कामासाठी महसूल विभागातील तलाठी आस्थापना व सामान्य आस्थापना मधील या भ्रष्ट अधिकाऱ्याला मदत करून शासनाला खोटी माहिती पाठवणारे ते ङ्गङ्गअतिसभ्यङ्गङ्ग दोन अधिकारीसह इतर या बातमीत नाव न घेता तुमच्या लक्ष्यात क्लिक झालं ना सेवानिवृत्त मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्या कार्यकाळात बऱ्याच तक्रारी झाल्यात त्यातल्या काही तक्रारींची त्यांनी सोन्याच्या किमतीतली कृषक/अकृषक कागदपत्रे करून चांगली पेरणी चांगलेच पिक घेतलेल्याची सर्वत्र चर्चा आहे. त्या तक्रारकर्त्यांची मर्जी सांभाळून स्वताहाच चांगभलं करून घेतलं महसूल विभागातील काही अधिकारी-कर्मचारी




हाताशी धरून केलेल्या नियमबाह्य कामावर पांघरून टाकण्यास सोबती केले. तक्रारदार यांनी दि.२४/०८/२०२५ आणि दि. १५/०७/२०२६ रोजी तक्रार अर्ज दिले. त्यात आरोप असा आहे की, तत्कालीन मंडळ अधिकारी, बुलढाणा श्री विजय टेकाळे यांनी सातगाव महसूल येथील राजस्व मंडळातील चांडोळ भाग-१ व चांडोळ भाग-२ येथे कार्यरत असताना मोठ्या प्रमाणात ५२ अनधिकृत वाटण्या,प्लॉटचे परस्पर मंजूर केल्यामुळे त्यांची जिल्हास्तरावरून उपविभागीय अधिकारी (महसूल) व तहसीलदार (महसूल) यांच्यामार्फत सदर प्रकरणी चौकशी करावी, अशी मागणी केली होती. दुसऱ्या तक्रारीनुसार, श्री टेकाळे हे तत्कालीन मंडळ अधिकारी असताना, त्यांच्यावर एसीबी चौकशीची कार्यवाही प्रलंबित असताना,त्यांना मंडळ अधिकारी या पदावरून नायब तहसीलदार या पदावर पदोन्नती दिल्याच्या प्रस्तावाची चौकशी करण्याबाबत विनंती केली होती.तक्रारदाराचा आरोप आहे की,महसूल विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खरी माहिती लपवून पदोन्नतीसाठी खोटे विवरण, अहवाल पत्र दिले.

**अजून बरेच काही पुढील भागात**

### जिल्हाधिकाऱ्यांनी नेमली चौकशी समिती!

या तक्रारींची दखल घेऊन जिल्हाधिकारी, बुलढाणा (डॉ. प्रविणकुमार देवरे, भा.प्र.से.) यांनी दि. २९/०९/२०२६ रोजी आदेश काढून ३ सदस्यीय चौकशी समिती गठीत केली.

१)श्री एस.ए. खांदे अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा अध्यक्ष
२) श्री समाधान गायकवाड उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा सदस्य
३) श्रीमती वृषाली केसरकर तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा सदस्य

समितीला दि. ३०/१०/२०२६ रोजी अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

### तक्रारदाराची लेखी बाजू...

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, अपर जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्ष श्री एस.ए. खांदे साहेब यांच्या न्यायालयात मागील महिन्यात २२/१०/२६ ला त्यांनी लेखी जवाब दिला आहे.

तक्रारदाराची मागणी अशी आहे की,

विजय दत्तात्रय टेकाळे यांनी केलेल्या नियमबाह्य कामांची व त्यातून भ्रष्टाचार करून कमावलेल्या चल-अचल संपत्तीची पूर्ण चौकशी व्हावी,महसूल विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खरी माहिती लपवून पदोन्नतीसाठी दिलेल्या खोट्या विवरण अहवाल पत्राची चौकशी व्हावी,शासनाची केलेली दिशाभूल उघड व्हावी, सेवानिवृत्त विजय टेकाळे यांची नियमबाह्य पदोन्नती रद्द करून वाढीव घेतलेले वेतन व्याजासह वसूल करावे, त्यांची पेन्शन थांबवावी, त्यांना मदत करणाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई व्हावी, अशी मागणी आहे.

# शेतकरी थेंब जपतोय, अन् बुलढाण्याच्या हॉस्पिटल लाईनला पूरपाइप फुटला, मग चार तास पालिकेला पाणी का थांबवता आलं नाही?

**जनसंचलन-बुलढाणा**

शेतात पाण्याचा एकेक थेंब जपावा लागतोय, अन् बुलढाणा शहरात हजारो लिटर पाणी रस्त्यावरून वाहून गेलं! हॉस्पिटल लाईन परिसरात जलवाहिनी फुटल्याने तब्बल चार तास रस्त्यावरून पुरासारखे पाणी वाहत राहिले. रस्त्यावर पाणी साचल्याने नागरिकांची ये-जा अडली. दुष्काळाचं सावट असताना पाण्याचा प्रवाह थांबवण्यासाठी एवढा वेळ का लागला, असा सवाल आता नगरपालिकेला विचारला जात आहे. धरणातील पाणीसाठा घटत असताना आगामी उन्हाळ्यात



शहराला पुरेसं पाणी मिळेल का, याची चिंता आहे. अशा वेळी मुख्य प्रश्न दुरुस्तीला किती वेळ लागतो एवढाच नाही. गळतीची माहिती पाणीपुरवठा विभागाला नेमकी किती वाजता मिळाली? ती मिळाल्यानंतर संबंधित भागाचा पाणीपुरवठा बंद करण्यासाठी कोणती पावलं उचलली? चार तासांत किती पाणी वाया गेलं, याची नोंद पालिका घेणार का? जलवाहिनी फुटली कशाने? चौकशीची जबाबदारी कोण घेणार? जलवाहिनी जुनी होती, पाण्याचा दाब वाढला होता की अन्य तांत्रिक बिघाड झाला, हे तपासणीतून स्पष्ट व्हायला हवं. या वाहिनीची शेवटची पाहणी कधी झाली आणि दुरुस्तीची गरज यापूर्वी नोंदवली होती का, याचाही तपशील पालिकेने जाहीर करावा. चौकशीत निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कारवाई होणार का, हाही प्रश्न आहे. गळती तातडीने थांबवून जलवाहिनी दुरुस्त करावी आणि साचलेलं पाणी कमी करून रस्ता मोकळा करावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. शहरातील जुन्या जलवाहिन्यांची पाहणी करून गळतीची माहिती मिळताच पाणीपुरवठा बंद करण्याची यंत्रणा किती वेळात कामाला लागेल, हेही पालिकेने स्पष्ट करावं. टंचाई आली की नागरिकांना पाणी जपून वापरायला सांगितलं जातं. मग आज रस्त्यावरून वाहिलेल्या पाण्याचा हिशेब पालिका कधी देणार?

# अपत्य मर्यादेची रेषा



दोनपेक्षा जास्त अपत्ये असणाऱ्या व्यक्तींना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यास असलेला अडसर आता दूर होण्याच्या मार्गावर आहे. आतापर्यंत अनेक राज्यांमध्ये दोन अपत्यांच्या निकषामुळे अशा उमेदवारांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका किंवा महापालिका निवडणूक लढवता येत नव्हती. उमेदवारी अर्ज भरताना अपत्यसंख्या लपवली आणि नंतर ती बाब उघड झाली, तर निवडून आल्यानंतरही संबंधित सदस्य अपात्र ठरू शकत होता. आता ही अट निष्प्रभ ठरणार असल्याने लोकशाही सहभागाचा विस्तार होईल, असे मानले जात आहे. या निर्णयाचे परिणाम केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नाहीत. लोकसंख्या धोरण, प्रजनन दर, उत्तर-दक्षिण असमतोल, प्रतिनिधित्व, निधीवाटप आणि लिंगसमता अशा अनेक प्रश्नांशी हा निर्णय जोडलेला आहे. दोन अपत्यांच्या निकषाला २००३मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ङ्घजावेद विरुद्ध हरियाणा राज्यफ या प्रकरणात घटनात्मक वैधता दिली होती. त्या काळात देशाचा एकूण प्रजनन दर सुमारे तीन होता. लोकसंख्या नियंत्रण ही राष्ट्रीय गरज मानली जात होती. छोट्या कुटुंबाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी काही राज्यांनी निवडणूक लढवण्यासही अपत्यसंख्येची अट जोडली. संदेश स्पष्ट होता, सार्वजनिक जीवनात सहभागी होणाऱ्यांनी लोकसंख्या नियंत्रणाचे उदाहरण घालून द्यावे. मात्र, दोन दशकांत परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. भारताचा एकूण प्रजनन दर आता १.९पर्यंत खाली आला आहे. लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी आवश्यक असलेला ङ्घरिप्लेसमेंट रेटफ २.१ मानला जातो. हा दर त्याखाली गेला, तर दीर्घ काळात वृद्ध लोकसंख्या वाढते आणि कामकाजाच्या वयोगटातील लोकसंख्या कमी होऊ लागते. त्यामुळे आजचा प्रश्न केवळ लोकसंख्या वाढ रोखण्याचा राहिलेला नाही, तर लोकसंख्येचे वयमान, कामगारशक्ती, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक उत्पादकता यांचाही आहे. याच पार्श्वभूमीवर दक्षिण भारतातील राज्यांची चिंता वेगळी आहे. केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगण यांसारख्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात मोठे यश मिळवले. त्याच यशाची राजकीय आणि आर्थिक किंमत त्यांना चुकवावी लागेल, अशी भीती आता व्यक्त होत आहे. लोकसभा मतदारसंघांची पुर्ररचना लोकसंख्येच्या आधारे झाली, तर उत्तर भारतातील राज्यांच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढू शकतात. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, झारखंड यांसारख्या राज्यांत लोकसंख्या वाढ तुलनेने जास्त आहे. त्यामुळे लोकसभेत उत्तर भारताचे प्रतिनिधित्व वाढेल आणि दक्षिणेकडील राज्यांचा राजकीय वाटा घटेल, अशी भीती तेथे आहे. वित्त आयोगाच्या निधीवाटपातही लोकसंख्या हा महत्त्वाचा निकष असल्याने दक्षिणेकडील राज्यांचा आक्षेप अधिक तीव्र होतो. लोकसंख्या नियंत्रण केले म्हणून आम्हाला कमी निधी मिळणार का, असा त्यांचा प्रश्न आहे. पंधराव्या वित्त आयोगाने २०११च्या जनगणनेचा आधार घेतल्यावर ही नाराजी अधिक स्पष्ट झाली. ज्या राज्यांनी कुटुंब नियोजन, आरोग्य, शिक्षण आणि महिला सक्षमीकरणात काम करून प्रजनन दर कमी केला, त्यांनाच केंद्राच्या निधीवाटपात तोटा होणार असेल, तर हा न्यायाचा प्रश्न ठरतो. म्हणूनच चंद्राबाबू नायडू किंवा एम. के. स्टॅलिन यांसारख्या नेत्यांनी अधिक अपत्यांना प्रोत्साहन देण्यासंदर्भात भूमिका मांडली. ती भूमिका वरकरणी विचित्र वाटली, तरी तिच्या मागे प्रतिनिधित्व आणि संसाधनवाटपाची चिंता आहे. दुसरीकडे, उत्तर भारतातील काही राज्यांत लोकसंख्या वाढ अजूनही गंभीर प्रश्न आहे. बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, झारखंड या राज्यांत प्रजनन दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे देशभरासाठी एकच लोकसंख्या धोरण लागू करणे कठीण आहे. दक्षिण भारत वृद्धत्वाच्या समस्येकडे पाहत आहे, तर उत्तर भारत अजूनही लोकसंख्या वाढ आणि आरोग्यसेवेच्या आव्हानांशी झुंजत आहे. म्हणूनच दोन अपत्यांचा निकष हटवताना प्रदेशनिहाय वास्तव लक्षात घेणे आवश्यक आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भविष्यात आमदारही होणार नाही फडणवीसांच्या खास नेत्याचा रोहित पवारांना इशारा...

रोहित पवार हे मढ्याच्या टाळुवरचं लोणी खायचा प्रयत्न करत आहेत. रोहित पवार काँग्रेसच्या वाटेवर चाललेलंल पिल्लू आहे, ते कुठल्याही विषयावर राजकारण रोहित पवार करत आहेत, देवेंद्र फडणवीस यांचं अजित दादांवर किती प्रेम होते ते आम्ही जवळून पाहिलं आहे, असं म्हणत भारतीय जनता पक्षाचे आमदार राजेंद्र राऊत यांनी रोहित पवार यांनी तोंड सांभाळून बोलावे असा थेट इशारा दिला आहे. रोहित पवार ही डोक्यावर पडलेली व्यक्ती आहे. रोहित पवार म्हणजे मेलेल्या माणसाच्या टाळूवरचे लोणी खाणारी औलाद आहे. अजित पवार यांची जागा कसं मिळेल यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांना घरात काहीही किंमत नाही, पवार साहेब आणि सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड कोणाशी याचं जमत नाही. मी या राज्याचा विरोधी पक्ष नेता आहे असं दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करतोय,फक्त अशी घणाघाती टीका राजेंद्र राऊत यांनी केली आहे. दादांच्या बाबतीत जे घडलं ते दुर्दैवी आहे, रोहित पवार याने आता तोंड सांभाळून बोलावं. त्याने जे आरोप केलं त्याची फार मोठी किंमत रोहित पवाराला मोजावी लागेल. तू राज्यात मंत्री होण्याचे स्वप्न बघणे सोड, आमदार देखील तू पुन्हा होणार नाही. तु भविष्यात आमदार होतो कि नाही ते बघ गृहमंत्रीपद तर खूप लांबची गोष्ट आहे,फक्त असंही आमदार राजेंद्र राऊत यावेळी म्हणाले.





दरम्यान, ङ्घमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दाखवलेले फोटो एआयवर सुद्धा केले जाऊ शकतात. सुप्रिया सुळेंची सुद्धा आता डीलिमिटेशनला पाठिंबा देण्याची तयारी झाली आहे. त्याला कुठेचं किंमत नाहीये, त्यामुळे हा असे आरोप करतोय. यांचे सुद्धा कोणाचे कोणासोबत फोटो होते ह्याच्या ही बऱ्याच चर्चा होत आहेत. देवेंद्र फडणवीस यांचे अजित पवार यांच्यावर प्रेम होते, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यात अतिशय दोस्ताना होता,फक्त असंही यावेळी राजेंद्र राऊत यांनी स्पष्ट केले.

# एक बिहारी सबपर भारी; महाराष्ट्राला यूपी-बिहारमधील लोकांची अत्यंत गरज, शिंदेंच्या नेत्याचे विधान!

**मुंबई**

एकीकडे राज्यात छठपूजेवरून चांगलंच राजकारण सुरू असताना, आता शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी छठपूजेच्या कार्यक्रमादरम्यान केलेलं विधान चर्चेत आलं आहे. महाराष्ट्राला उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिकांची अत्यंत गरज असल्याचं विधान मोरे यांनी केलं आहे. एक बिहारी सबपर भारी, एक बिहारी दोन ते तीन जणांचे काम एकटाच करतो,फक्त असं म्हणत त्यांनी मनसेला अप्रत्यक्ष टोला लगावल्याची चर्चा आहे. उत्तर भारतीय नागरिक गावी परतल्यानंतर महाराष्ट्रातील उद्योगधंदे आणि बांधकाम व्यवसाय ठप्प झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे. छठपूजेला आमचा पूर्ण पाठिंबा असून, या उत्सवाच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे राहू, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, कल्याणमधील दुर्गाडी येथील गणेश घाटावर छठपूजेचा भव्य उत्साह पाहायला मिळाला. मात्र, याच छठपूजेच्या व्यासपीठावरून शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी केलेल्या विधानाने राजकीय चर्चे ला तोंड फुटलं आहे. महाराष्ट्राला उत्तर प्रदेश आणि बिहारमधील नागरिकांची अत्यंत गरज असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मराठी-अमराठी वादाच्या काळात उत्तर भारतीय आणि बिहारी नागरिक मोठ्या संख्येने आपल्या गावी परतले होते. त्यावेळी महाराष्ट्रातील उद्योगधंदे, मिलमधील कामकाज आणि बांधकाम व्यवसायावर परिणाम झाल्याचा दावा मोरे यांनी केला. पुढे बोलताना ङ्घएक बिहारी सबपर भारी, एक बिहारी दोन ते तीन जणांचे काम एकटाच करतो,फक्त असं विधान त्यांनी केलं. आता अरविंद मोरे यांच्या या वक्तव्याचा रोख मनसेकडे असल्याची चर्चा रंगली आहे. छठपूजा हा हिंदूंचा सण असून या उत्सवाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. उत्तर भारतीय आणि बिहारी बांधवांच्या या उत्सवासाठी आम्ही पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी भूमिकाही अरविंद मोरे यांनी मांडली. त्यामुळे छठपूजेच्या कार्यक्रमातील त्यांच्या या विधानाची कल्याणच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. दरम्यान, एकीकडे मनसे छठपुजेला विरोध करत असतानाच आता शिंदेंच्या नेत्याने असं विधान केल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.



# अजितदादांच्या मृत्यूला आठ महिने उलटले तरी; एकनाथ खडसेंनी उपस्थित केला संशय

**जनसंचलन/बुलढाणा**

अजित पवार यांच्या मृत्यूवरून महाराष्ट्राच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप पुन्हा एकदा तीव्र झाले आहेत. आमदार रोहित पवार यांनी ङ्घमफलर मॅनफच्या ओळखीबाबत एक धाडसी दावा केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. अजित दादांच्या कथित मारेकऱ्यांना कोण संरक्षण देत आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर आता एकनाथ खडसेंनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ खडसे म्हणाले की, अजितदादांच्या मृत्यूला ८ महिने उलटले तरी निष्कर्ष नाही. कुठेतरी संशयाचं वातावरण आहे. ते दूर करण्याची आवश्यकता आहे. समाजाच्या मनात संभ्रम आहे आणि तो संभ्रम दूर झाला पाहिजे. अजित पवार यांच्या मृत्यूला आता जवळपास आठ महिने होत आले आहेत. मात्र त्यांच्या मृत्यूबाबत आजही समाजाच्या मनात अनेक शंका आहेत. हा घात आहे का, खून आहे का, की अपघातानं मृत्यू झालेला आहे, असा सवाल वारंवार उपस्थित केला जात आहे. ते म्हणाले की, या प्रकरणाची ने चौकशी करावी. च्या माध्यमातून चौकशी करावी, अशी मागणी अनेकवेळा करण्यात आली आहे. सरकारने चौकशी सुरू केली असं सांगितलं जात आहे. पण आठ महिने होऊनही त्याचा निष्कर्ष अजून समोर आलेला नाही. त्यामुळेच आज रोहित पवार यांनी या प्रकरणाची चौकशी कडे



द्यावी, अशी मागणी केली आहे. त्यासाठी सरकारला स्मरणपत्र द्यावं लागत आहे. एकनाथ खडसेंनी सांगितलं की, सरकार स्वतःहून घोषणा का करत नाही की आम्ही हे प्रकरण कडे देत आहोत, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. कुठेतरी संशयाचं वातावरण आहे, ते दूर करण्याची आवश्यकता आहे. समाजाच्या मनात संभ्रम आहे आणि तो संभ्रम दूर झाला पाहिजे, अशी भावना एकनाथ खडसे राष्ट्रवादीचे शरद पवार पक्षाचे नेते यांनी व्यक्त केली आहे. तर दुसरीकडे अजित पवार यांच्या मृत्यू प्रकरणात न्याय मिळेपर्यंत आपला लढा सुरूच ठेवण्याचा रोहित पवार यांनी निर्धार व्यक्त केला आहे. अजित दादांची आठवण काढताना ते भावूकही झाले. त्यांनी व्हीएसआर या विमान कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांच्यासोबतच्या आपल्या कथित व्यावसायिक संबंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन दिवसांत सिंग यांनी फ्लोरिडामध्ये एक आलिशान बंगला खरेदी केल्याचा दावा त्यांनी केला.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# पोर्तुगालला गेली, तिथे जाताच विकून टाकलं, लैंगिक छळ आणि... नागपूरच्या महिलेसोबत धक्कादायक प्रकार

■ मुंबई/वृत्तसंस्था



गलेलठ्ठ पगाराच्या आमिषामुळे नागपूरची एक महिला पोर्तुगालमध्ये नोकरीसाठी गेली. तिथे जाताच तिची विक्री करण्यात आली. या महिलेचा लैंगिक छळ करण्यात आला. मारहाण करण्यात आली. त्यानंतर तिच्या नवऱ्यालाही धमकावण्यात आलं. अचानक घडलेल्या प्रकारामुळे ही महिला आणि तिचे कुटुंबीय हादरून गेले आहेत. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत या प्रकरणी आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.नागपूरमधील ही 28 वर्षीय महिला आहे. तिला दीड लाख रुपये पगार देण्याचं अमिष दाखवण्यात आलं होतं. पुण्याच्या एका कन्सल्टंट एजन्सीने हे अमिष दाखवलं होतं. सुपरमार्केटमध्ये नोकरी देण्याऐवजी पोर्तुगालमधील बिअर शॉप मालकाला महिलेला विकल्याचा धक्कादायक आरोप आहे. त्यामुळे ही महिला पोर्तुगालला गेली. पण तिथे तिला बियर शॉपच्या मालकाला विकण्यात आलं. तिच्याकडून तिथे जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषणही करण्यात आलं. मालकाच्या घरी ठेवून तिचं लैंगिक शोषण केल्याची तक्रार आहे. 'तुला खरेदी करण्यासाठी भारतातील एजंटना पैसे दिले आहेत', असं बिअर शॉप मालकाने सांगितल्याचा महिलेचा दावा आहे.ही महिला इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पुण्यातील एका कन्सल्टन्सीच्या संपर्कात आली होती. तिला कंपनीच्या लोकांनी पोर्तुगालमध्ये कॅशियरची नोकरी देण्याचं आमिष दाखवलं. महिन्याला दीड लाख रुपये पगार मिळेल आणि आठ तासाची नोकरी राहील असंही सांगितलं. त्यामुळे ही महिला आणि तिच्या घरातील लोक खूश झाले. आता घरातील आर्थिक चणचण संपेल असं त्यांना वाटू लागलं. एवढं मोठं पॅकेज मिळतंय म्हटल्यावर सदर महिला ही कंपनीच्या जाळ्यात आली. व्हिसा आणि इतर कागदपत्र तयार करण्याच्या नावाखाली या महिलेकडून टप्प्या टप्प्याने 11 लाख रुपये वसूल करण्यात आले.पण ही महिला पोर्तुगालला गेल्यावर कहाणी संपूर्णपणे बदलून गेली. महिला पोर्तुगालला जाताच एजंटांनी तिचा पासपोर्ट हिरावून घेतला. त्यानंतर तिला दोन दिवस एका खोलीत बंद करून ठेवलं. त्यानंतर या महिलेला बियर शॉपच्या मालकाला विकलं. तिथे तिच्याकडून जबरदस्तीने काम करून घेण्यात आलं. या महिलेने त्याला विरोध केल्यावर तिला मारहाण करण्यात आली. तिचं शारीरिक आणि मानसिक शोषण करण्यात आलं.महिलेने त्यांना पासपोर्ट मागितल्यावर आरोपींनी तिच्याकडे पैशाची मागणी केली. एक महिनाभर हा अत्याचार सहन केल्यानंतर या महिलेला तिथून निसटण्याची संधी मिळाली. तिथून निसटताच आधी ती पोर्तुगालहून बसने लिस्बनला गेली. नंतर मॅड्रिडला आली. त्यानंतर ती दोहा मार्गे कशी तरी भारतात पोहोचली.भारतात पळून आल्यावरही तिची ससेहोलपट संपली नाही. कन्सल्टन्सीशी संबंधित लोकांनी तिला पुन्हा तीन लाख रुपये मागितले. तिला परत माल्टामध्ये नोकरी देण्याचं अमिष दाखवलं. तिने पैसे देण्यास नकार दिल्यावर तिच्या नवऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिली. महिलेला खोट्या केसेसमध्ये अडकवण्याची धमकी दिली. त्यानंतर या महिलेने वैतागून पोलिसांमध्ये तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी या कन्सल्टन्सीच्या संचालकासहीत 8 जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींवर मानवी तस्करी, फसवणूक आणि जबरदस्तीने पैसे वसूल करण्याचे आरोप करण्यात आले आहेत. पोलीस सध्या आरोपींचा शोध घेत आहेत.

## गुंगीचे औषध देऊन पतीवर जीवघेणा हल्ला, नंतर जिवंत गाडण्याचा प्रयत्न; बारामतीत खळबळ

■ वसई/वृत्तसंस्था




गेल्या काही काळापासून गुन्हेगारीच्या प्रमाणात झपाट्याने वाढ झाली आहे. अशातच आता बारामती शहरातील एका धक्कादायक प्रकरणाने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पतीला गुंगीचे औषध देऊन अर्धबेशुद्ध केल्यानंतर त्याच्यावर बॅटने हल्ला करून घरातच बांधलेल्या चौकोनी कट्ट्यात पुरण्याचा कथित प्रयत्न झाला आहे. याबाबतची तक्रार बारामती शहर पोलिसांकडे दाखल झाली आहे. या प्रकरणी पत्नीविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. बारामतीतील या घटनेप्रकरणी प्रकाश कान्होबा जगताप (वय 71, रा. ढाकाळे, ता. बारामती) यांनी बारामती शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार त्यांची सून शर्मिला प्रविण जगताप (वय 38, रा. इंद्रप्रस्थ सोसायटी, जामदार रोड, बारामती) हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम 109(1) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता पुढील तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

फिर्यादीनुसार, 30 जुलैच्या रात्रीपासून 1 ऑगस्टच्या सकाळीदरम्यान हा प्रकार घडला. आरोपी महिलेने तिचे पती प्रविण प्रकाश जगताप (वय 41) यांना गुंगीचे औषध देऊन अर्धबेशुद्ध केले. त्यानंतर बॅटने मारहाण करून त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, हल्ल्यानंतर जखमी व बेशुद्ध अवस्थेतील प्रविण जगताप यांना घरातील हॉललगतच्या गॅलरीत बांधलेल्या चौकोनी कट्ट्यात ठेवून त्यावर फरशी बसवून पुरण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, हा कथित कट उघडकीस आल्यानंतर प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले.तक्रारीच्या आधारे बारामती शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक शशिकांत इंगवले करत आहेत. जखमी प्रविण जगताप यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून घटनेमागील नेमके कारण, पुरावे आणि सर्व परिस्थितीचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासाअंतीच स्पष्ट होणार असून, शहरात या घटनेची मोठी चर्चा सुरू आहे.

## ऑफिसमधील वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून महिलेचा टोकाचा निर्णय

■ नागपूर/वृत्तसंस्था



कर्नाटकच्या म्हैसूरमधून धक्कादायक घटना घडली आहे. म्हैसूरच्या हिंकलमध्ये शुक्रवारी एका 45 वर्षीय महिलने राहत्या घरात आत्महत्या केली आहे. नागेश्वरी असे महिलेचे नाव आहे. पती अशोक यांनी वारंवार नागेश्वरीला फोन केला, परंतु त्यांचा फोन नागेश्वरीने उचलला नाही. त्यानंतर तातडीने घरी पोहोचले. त्यावेळी घरात एका बाजूला नागेश्वरी आढळून आली. त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले.नागेश्वरीने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घरी धाव घेतली. त्यावेळी घरात तपासादरम्यान तिने आत्महत्यापूर्वी लिहिलेली चिठ्ठी आढळली. यात तिने काम करत असलेल्या ऑफिसवर गंभीर आरोप केले आहेत. ती एका सुपरमार्केटमध्ये काम करत होती. ती या कंपनीत गेल्या अनेक वर्षांपासून काम करत होती. परंतु तिला अनेक त्रासाला सामोरे जावे लागत होते. तिने या चिठ्ठीत डॉली नावाच्या सुपरवायझरवर मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. तिने आठवड्याची सुट्टी आणि चुका न करताही छळले जात आहे, असा आरोप चिठ्ठीत केला आहे.नागेश्वरीने चिठ्ठीतून बेकायदेशीररित्या कामावरून काढून टाकल्याचाही आरोप केला आहे. आजारी असताना दोन-तीन दिवस कामावर न आल्याने कामावरून काढून टाकल्याचा आरोप केला आहे. या वागणुकीला कंटाळून आत्महत्या करत असल्याचे तिने चिठ्ठीत म्हटलं आहे. सध्या पोलिसांनी ही चिठ्ठी जप्त केली आहे. आता पोलीस आरोपी आणि इतर संबंधित माहितीचा तपास घेत आहे. या घटनेने नागेश्वरीचे पती अशोक यांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेनंतर अशोक यांनी संबंधित सुपरमार्केट आणि आरोपींवर कडक कारवाईची मागणी केली आहे. नागेश्वरीच्या आत्महत्येने राहत असलेल्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## पुणे होतंय गुन्ह्यांचं माहेर घर... PG मध्ये राहणाऱ्या तरुणाची हत्या, तर तरुणी गंभीर जखमी

■ पुणे/वृत्तसंस्था

विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची ओळख होती, पण आता वाढत्या गुन्हेगारीच्या घटना पाहता पणे गुन्ह्यांचं माहेर घर होतंय का? असा प्रश्न पुन्हा उपस्थित होत आहे. पुण्यात अनेक महिलांवर अत्याचार झाल्याच्या घटना समोर आल्या, आता भरदिवसा PG मध्ये राहत असलेल्या तरुणाची हत्या झाली असून तरुणी गंभीर जखमी असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. PG मध्ये असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमुळे घडलेली घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तरुणीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु असून, प्रेमाच्या त्रिकुटामुळे मोठी घटना घडल्याचं तपासात समोर आलं आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.संबंधित घटना पुणे येथील हिंजवडी भागात घडली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हिंजवडी स्थित सात मजल्यांच्या PG मध्ये गेल्या चार महिन्यांपासून सागर गायकवाड मॅनेजर म्हणून काम करत होता... बुधवारी रात्री एक तरुणी एका महिन्यासाठी त्याच PG मध्ये राहण्यासाठी आलेली. तरुणीने PG संचालकाला सांगितलं की, 'सागर माझा बॉयफ्रेंड आहे...', त्यामुळे तिच्या राहण्याची व्यवस्था तिसऱ्या मजल्यावर करण्यात आली. PG मधील 310 नंबरच्या खोलीत तरुणीला राहण्यासाठी जागा मिळाली.त्यानंतर दुसऱ्या दिवशी दिनेश महादेव झांबरे नावाचा तरुण PG मध्ये आला. दिनेश याने सांगितलं, सागर याला भेटायचं आहे... आणि तिची प्रेमिका देखील येथेच राहते, PG मधील कर्मचाऱ्याने सांगितलं की, सागर तिसऱ्या मजल्यावर राहत आहे. त्यानंतर दिनेश स्वतः तिसऱ्या मजल्यावर पोहोचला. तो पोहोचल्यानंतर, काही वेळातच ओरडण्याचा आवाज येऊ लागला... जेव्हा घटनास्थळी लोकांची गर्दी जमली, तोपर्यंत उशीर झालेला. सागर जमिनीनर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेलाय. दिनेश याने सागर याच्यावर लोखंडी रॉडने वार केले. कथित आरोपीने तरुणीवर देखील जीवघेणा हल्ला केला. सुरुवातीच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, दिनेश आणि तरुणी शाळेत असल्यापासून एकमेकांच्या संपर्कात होते. दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची माहिती देखील समोर येत आहे. त्यानंतर दोघे बीसीएचं शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आले. पुण्यात आल्यानंतर तरुणी आणि सागर यांच्यातील संबंध रिलेशनशिपपर्यंत पोहोचले... पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याच कारणामुळे कथित आरोपीने असं कृत्य केलं. घडलेल्या घटनेत सागर याची हत्या झाली असून तरुणी गंभीर जखमी आहे. तिच्यावर उपचार सुरु आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे घटनेचं रहस्य समोर आलं. प्राथमिक तपासानुसार, आरोपीने सागरवर लोखंडी सळईने 13 ते 14 वेळा सपासप वार केले. पोलीस त्या फुटेजच्या आधारे तपास करत आहेत. पोलिसांनी दिनेश महादेव झांबरे या आरोपीला अटक केल्याची माहिती देखील समोर येत आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेचा शानदार समारोप


## 'बॅटन'चा अहमदाबादच्या दिशेने प्रवास सुरू, सांगता सोहळ्यात भारताच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन

■ ग्लासगो, वृत्तसंस्था :

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा समारोप झाला असून सांगता होत असताना भारताने जगाला पुढील राष्ट्रकुल खेळांसाठी अहमदाबादमध्ये येण्याचे उत्साही निमंत्रण दिले. प्राचीन तत्त्वज्ञान, समकालीन कला आणि सांस्कृतिक भव्यतेचा सुरेख संगम असलेल्या एका सादरीकरणाद्वारे ही जबाबदारी भारताकडे सोपवण्यात आली. यासोबतच 2030 मधील या क्रीडास्पर्धेच्या शताब्दी आवृत्तीच्या दिशेने भारताचा प्रवास अधिकृतपणे सुरू झाला.

रविवारी 'ओव्हीओ हायड्रो' येथे झालेल्या समारोप सोहळ्यातील सर्वांत भावपूर्ण क्षण ग्लासगोने राष्ट्रकुल खेळांची बॅटन अधिकृतपणे भारताकडे सोपविली तो होता. त्यानंतर संगीत, नृत्य आणि कथाकथनाच्या माध्यमातून भारताची जिथे परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर मेळ पाहायला मिळतो, अशी ओळख जगासमोर मांडण्यात आली. राजे चार्ल्स तृतीय यांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले प्रिन्स एडवर्ड (ड्यूक ऑफ एडिनबर्ग) यांनी या क्रीडास्पर्धांची सांगता झाल्याची अधिकृत घोषणा केली.

महिलांच्या 57 किलो वजन गटातील बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलेल्या जस्मिन लंबोरिया हिने समारोप सोहळ्यात












भारताचा ध्वज फडकविला. अधिकृत हस्तांतरण प्रक्रियेची सुऊवात राष्ट्रकुल ध्वज मैदानावरून नेण्याच्या प्रतीकात्मक प्रवासाने झाली. स्कॉटिश आणि भारतीय ध्वज हाती घेतलेल्या ध्वजवाहकांच्या नेतृत्वाखालील मिरवणुकीत घडी घातलेला राष्ट्रकुल खेळांचा ध्वज खाली उतरवण्यात आला. त्यानंतर ग्लासगोच्या लॉर्ड प्रोवोस्ट जॅकलीन मॅक्लरेन यांनी तो ध्वज 'कॉमनवेल्थ गेम्स स्कॉटलंड'च्या उपाध्यक्षा सुझान जॅक्सन, स्कॉटिश नेटबॉल खेळाडू एमिली निकोल आणि 'कॉमनवेल्थ स्पोर्ट'च्या प्रतिनिधींकडे सोपवला.

या कार्यक्रमात आकर्षक डिजिटल दृश्यांच्या पार्श्वभूमीवर शेकडो नर्तकांनी भारताच्या विविधतेचे विलोभनीय चित्र उभे केले, तर संगीतकार शंकर महादेवन यांच्या हृदयस्पर्शी संगीताने पाश्चात्य ऑर्केस्ट्राची भव्यता आणि भारतीय संगीत परंपरा यांचा सुरेख संगम साधला. विविध भाषा, रीतिरिवाज आणि कलात्मक परंपरांच्या माध्यमातून जगाचे स्वागत करणाऱ्या एका समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवणे हा या सादरीकरणाचा उद्देश होता. एका विशेष लघुपटाद्वारे आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना अहमदाबाद शहराची ओळख करून देण्यात आली. गुजराती पार्श्वगायिका भूमी त्रिवेदी हिने यावेळी यजमान गुजरातला विशेष मानवंदना दिली. स्कॉटिश संगीत, कविता आणि नृत्याचा समावेश असलेल्या ग्लासगोच्या निरोप समारंभानंतर हा भारतीय कार्यक्रम सादर झाला. स्कॉटलंडची व्हीलचेअर रेसर मेलानी वूड्स हिने 'डेव्हिड डिक्सन पुरस्कार' पटकावला. हा पुरस्कार राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूला दिला जातो. अध्यक्ष डॉ. डोनाल्ड ऊकारे, दोन वेळा ऑलिम्पिक पदक जिंकणारा नीरज चोप्रा, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पी. टी. उषा आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या प्रसंगी यजमानपदाची जबाबदारी स्कॉटलंडकडून भारताकडे अधिकृतपणे सोपवण्यात आली. त्यानंतर भारताची सांस्कृतिक आणि सभ्यतेची मूल्ये मांडणारे सादरीकरण तीन टप्प्यांत पार पडले. या सादरीकरणाचा मुख्य संदेश 'वसुधैव कुटुंबकम्' हा होता. पहिल्या टप्प्यात 'वंदे मातरम्'च्या 150 व्या वर्धापनदिनाचेही स्मरण करण्यात आले, ज्यामध्ये अभिनेत्री मानुषी चिल्लरच्या नेतृत्वाखालील नृत्याचा समावेश होता. दुसऱ्या टप्प्यात 'सांस्कृतिक जुगलबंदी' या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले भारतीय सतारवादक ऋषभ शर्मा आणि प्रसिद्ध स्कॉटिश संगीतकार रॉस एन्सली यांची जोडी एकत्र आली. शर्मा यांचे सतारवादन आणि एन्सली यांचे स्कॉटिश 'पाईप्सवादन व 'व्हिसल्स' लोकांना रिझवून गेले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शंकर महादेवनने आपली मुले सिद्धार्थ आणि शिवम महादेवन यांच्यासह मंचावर पुनरागमन केले आणि भारताची अत्यंत लोकप्रिय गाणी सादर केली. यामध्ये 'सुनो गौर से दुनिया वालों', 'भाग मिल्खा', 'ए वतन वतन' आणि 'लहरा दो' यांसारख्या गाण्यांचा समावेश होता.

# कर्नाटक, झारखंड, मध्यप्रदेश विजयी

■ कोईमतुर, वृत्तसंस्था :

हॉकी इंडियाच्या 16 व्या कनिष्ठ पुरुषांच्या राष्ट्रीय हॉकी चॅम्पियनशिप स्पर्धेतील सातव्या दिवशी झालेल्या विविध सामन्यांत कर्नाटक, झारखंड आणि मध्यप्रदेश या संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर शानदार विजय नोंदवित पूर्णगुण वसुल केले.

सोमवारी या स्पर्धेतील खेळविण्यात आलेल्या पहिल्या सामन्यात कर्नाटकाने बंगालचा 4-3 अशा गोलफरकाने निसटता पराभव केला. या सामन्यातील 11 व्या मिनिटाला सुरजकुमार सहाने बंगालचे खाते उघडले. 29 व्या मिनिटाला प्रदीप मंडलने बंगालचा दुसरा गोल केला. नितेश शर्माने 38 व्या मिनिटाला बंगालचा तिसरा गोल करून कर्नाटकावर चांगलेच दडपण आणले होते. 51 व्या मिनिटाला प्रदीप मंडलने कर्नाटकाचा पहिला गोल, अचय्या एम. एम.ने कर्नाटकाचा दुसरा गोल, रेसीन एन्डने 58 व्या आणि अबेद




लुगुनने 60 व्या मिनिटाला कर्नाटकाचा आणि निर्णायक गोल केला. या सामन्यात कर्नाटकाला तीन गुण मिळाले. अ गटातील खेळविण्यात आलेल्या अन्य एका सामन्यात झारखंडने दिल्लीचे आव्हान 4-3 असे संपुष्टात आणले. चौथ्या मिनिटाला झारखंडचे खाते सबीयान किरोने उघडले. 40 व्या मिनिटाला प्रभज्योत सिंगने दिल्लीचे खाते उघडून बरोबरी केली. सबीयान किरोने 47 व्या मिनिटाला संघाचा आणि वैयक्तिक दुसरा गोल केला. सुजित करकेटाने 48 व्या मिनिटाला तर घुरण लोहराने 58 व्या मिनिटाला झारखंडचे गोल केले. दिल्लीतर्फे निशांतने 52 आणि 60 व्या मिनिटाला असे दोन गोल नोंदविले. तिसऱ्या सामन्यात मणीपूरने दादरा-नगर हावेली दिवदमणला 4-4 असे गोल बरोबरीत रोखले. सोमवारी खेळविण्यात आलेल्या शेवटच्या सामन्यात मध्यप्रदेशने तामिळनाडूचे आव्हान 4-0 असे संपुष्टात आणले. तसेच ओदीशाने मणिपूरचा 4-1 असा पराभव केला. हरियाणा आणि मध्यप्रदेश यांच्यातील सामना 2-2 असा बरोबरीत राहिला.

# हर्षिता जाखर टूर डी फ्रान्स फेम्समध्ये सहभागी होणारी पहिली भारतीय महिला

**नवी दिल्ली :** तरुण सायकलपटू हर्षिता जाखरने येथे 'टूर डी फ्रान्स फेम्स'मध्ये सहभागी होणारी पहिली भारतीय महिला ठरून इतिहासात आपले नाव कोरले. या 19 वर्षीय खेळाडूने रविवारी या खडतर शर्यतीच्या दुसऱ्या टप्प्याच्या औपचारिक प्रारंभावेळी अफगाणिस्तान, अल्जेरिया, चिली, इथिओपिया (दोन रायडर्स), नामिबिया आणि युगांडा येथील आठ प्रतिभावान सायकलपटूंच्या गटाचे नेतृत्व केले. ही स्पर्धा 1 ऑगस्ट रोजी लॉझान येथे सुरू झाली असून 9 ऑगस्ट रोजी नीस येथे संपेल. यूसीआय (युनियन सायक्लिस्ट डी इंटरनॅशनल) ने खास निवडलेल्या या संघाने डब्ल्यूसीसी रोड टीमच्या काही रायडर्ससोबत शर्यतीच्या मार्गाच्या एका तटस्थ भागावर 4.5 किलोमीटर सायकल चालवली, असे यूसीआयच्या एका निवेदनात म्हटले आहे. 'टूर डी फ्रान्स फेम्स' ही महिलांची बहु-टप्प्यांची सायकल शर्यत आहे, जी पुरुषांच्या 'टूर डी फ्रान्स'च्या समकक्ष आहे. ही यूसीआय महिला वर्ल्ड टूर कॅलेंडरचा एक भाग आहे.

स्टेज सुरू होण्यापूर्वी, यूसीआयचे अध्यक्ष डेव्हिड लॅपार्टिएंट हे रायडर्ससोबत स्टार्ट पोडियमवर सामील झाले आणि या स्पर्धेत एका भारतीयाला पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. भारताची अत्यंत प्रतिभावान हर्षिता जाखर आमच्या प्रतिष्ठित 'यूसीआय वर्ल्ड सायकलिंग टॅलेंट' कार्यक्रमात सहभागी झाल्याचा आम्हाला आनंद आहे. मला खात्री आहे की तिला 'टूर डी फ्रान्स फेम्स'चा भाग व्हायला आवडेल आणि ती लवकरच प्रत्यक्ष स्पर्धेत भाग घेण्यासाठी परत येईल, असे ते म्हणाले. व्यावसायिक पेलोटॉनच्या पुढे सुरुवात करणाऱ्या या रायडर्सची निवड अशा विविध राष्ट्रीय फेडरेशन्समधून केली जाते.

# क्रीडा मंत्री मांडविया यांच्यावतीने वेटलिफ्टिंग पथकाचे कौतुक; धनादेश सुपूर्द

■ मुंबई, वृत्तसंस्था :

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारतीय वेटलिफ्टर्सच्या दमदार कामगिरीचे कौतुक केले आणि ते म्हणाले की, त्यांनी जिंकलेल्या प्रत्येक पदकाने देशाला प्रचंड आनंद दिला आहे.

भारतीय वेटलिफ्टिंग संघाने या खेळांमध्ये एक सुवर्ण, सहा रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले. ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू ही एकमेव सुवर्णपदक विजेती ठरली. भारतात परतल्यानंतर मांडविया यांच्या हस्ते वेटलिफ्टर्सचा सत्कार करण्यात आला. मीराबाईला 30 लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तर रौप्य आणि कांस्य पदक विजेत्यांना अनुक्रमे 20 लाख आणि




10 लाख रुपये मिळाले.तुम्हाला कदाचित याची जाणीव नसेल, पण तुम्ही जिंकलेले प्रत्येक पदक देशाला प्रचंड आनंद देते. जेव्हा जेव्हा तुमच्यापैकी कोणी पदक जिंकले, तेव्हा संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच ही बातमी जाहीर केली गेली होती.

जे खेळाडू यावेळी पदक जिंकू शकले नाहीत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की खेळाडू कधीही हरत नाही. ते एकतर जिंकतात किंवा पुन्हा जिंकायला शिकतात,असे मांडविया सत्कार समारंभात म्हणाले. आमच्या तीन खेळाडूंना यावेळी पदके मिळवता आली नाहीत, पण मला खात्री आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वादाने आणि 140 कोटी भारतीयांच्या सदिच्छांनी तेही भविष्यात पदके घेऊन परत येतील, असेही ते पुढे म्हणाले. मीराबाईसाठी हे सलग तिसरे राष्ट्रकुल सुवर्णपदक होते, यापूर्वी त्यांनी 2018 आणि 2022 च्या स्पर्धांमध्येही हे सुवर्णपदक जिंकले होते.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# कलाकारांना एकत्र पाहून मी भारावून गेलो

## सिद्धार्थने सांगितला रणवीर-दीपिकाच्या रिसेप्शन मधला अनुभव..

अभिनेता सिद्धार्थ जाधवने मराठीसह हिंदीतही अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये वेब सिरीजमध्ये काम केले आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'मटका किंग' या वेब सिरीजमधील त्याच्या अभिनयाचे सगळीकडे कौतुक झाले. रणवीर सिंहची एनर्जी मॅच करणारा मराठीतला हा एकमेव असेल. दोघांनी सिंबा चित्रपटात एकत्र काम केल्यापासून सिद्धार्थ आणि रणवीर सिंह यांची चांगली मैत्री झाली. रणवीरने सिद्धार्थला आणि त्याच्या पत्नीला त्याच्या लग्नाच्या रिसेप्शन पार्टीलाही बोलावले होते. अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत सिद्धार्थ जाधवने रणवीरच्या रिसेप्शन पार्टीतील एक अनुभव सांगितला. रिसेप्शनला गेल्यानंतर दहाव्या मिनिटाला या पार्टीतून पत्नीला घेऊन निघून गेल्याचे त्याने सांगितले. पण त्याने असे का केले? याचे उत्तरही सिद्धार्थने या मुलाखतीत दिले आहे.

सिद्धार्थ म्हणाला, 'रणवीर सरांच्या लग्नाच्या रिसेप्शनला गेलो होतो त्यावेळी मी 'स्टार स्टक' झालो होतो. त्या रिसेप्शन पार्टीला सचिन तेंडुलकर सर, अमिताभ बच्चन सर, विकी कौशल सर असे सगळे स्टार्स होते. मी माझ्या पत्नीसोबत पार्टीला गेलो होतो. पार्टीत गेल्यावर तृप्तीला उद्या दहाव्या मिनिटाला म्हणालो 'चल आपण जाऊयात' मग तिनेच मला थांबवले. सगळ्या कलाकारांना एकत्र पाहून मी पूर्णपणे भारावून गेलो होतो. पहिल्यांदाच अशा मोठ्या पार्टीत मी गेलो होतो' 'त्यानंतर आम्ही दोघे रणवीर सर आणि दीपिका मॅमला जाऊन भेटलो आणि मी लगेच पार्टीतून निघालो. एवढ्या मोठ्या कलाकारांना पहिल्यांदाच एकत्र पाहून मी भारावून गेलो होतो. आजवर या सगळ्यांना मी फक्त पडद्यावर पाहिने होते. त्यामुळे यांना प्रत्यक्ष पाहायला मिळेल असे कधी वाटले नव्हते.' असे सिद्धार्थने सांगितले. रणवीर आणि सिद्धार्थची ओळख 'सिंबा' चित्रपटाच्या निमित्ताने झाली होती. तो म्हणाला, 'आमची मैत्री झाली ती रोहित शेट्टीमुळे. सिंबा चित्रपटाच्या शूटिंगसाठी आम्ही एकत्र विमानाने प्रवास करत होतो तेव्हा आम्ही पहिल्यांदा भेटलो. त्यानंतर चित्रीकरणादरम्यान आमच्यात छान मैत्री निर्माण झाली."



## 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिका घेणार प्रेक्षकांचा निरोप

टीआरपीच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी स्टार प्रवाहने अलीकडेच नव्या कोऱ्या ८ मालिकांची घोषणा केली आहे. नव्या मालिकांच्या सपाट्यात मात्र, डॉ अमोल कोल्हे आणि अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांच्या प्रमुख भूमिका असलेली 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' ही मालिका आता अवघ्या १५२ भागांमध्येच प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. ही मालिका सुरू होऊन पाचच महिने झाले होते. १४ जूनला ही मालिका बंद होईल असे अभिनेते डॉ अमोल कोल्हे यांनी सांगितले.

'मालिका अवघ्या १५२ भागांमध्ये संपते हे दुर्दैव आहे, पण मालिकेची गोष्ट थांबणार नाही. एका वेगळ्या मंचावर ही गोष्ट प्रेक्षकांना पाहायला मिळेल' असे त्यांनी म्हटले. गेल्या काही दिवसांपासून 'मी सावित्रीबाई ज्योतिराव फुले' मालिका संपण्याविषयीच्या चर्चा सुरू होत्या. अखेर १५२ भागांमध्ये ही मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. या मालिकेच्या जागी 'सुना येती घरा' ही मालिका सुरू होणार आहे.

यावर अभिनेते डॉ अमोल कोल्हे म्हणाले 'शिक्षण हेच खरे सामर्थ्य' हा विचार



रुजवण्यासाठी सावित्रीबाई फुले आणि ज्योतीराव फुले यांनी बराच संघर्ष केला. 'मी सावित्रीबाई जोतिराव फुले' या मालिकेतून प्रेक्षकांनी या मालिकेतील त्यांचा प्रवास पाहिला आहे. मात्र खऱ्या अर्थाने जिथे त्यांची गोष्ट सुरू होते त्याच टप्प्यावर मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. ही मालिका संपणार असली तरी ही गोष्ट वेगळ्या व्यासपीठावर नव्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येईल .एकीकडे आपण महात्मा फुले यांचा जन्मशताब्दी वर्ष साजरा करतोय. पण १५२ भागांमध्येच मालिका संपते हे दुर्दैव आहे." असे अमोल कोल्हे म्हणाले.

## देऊलबंद २ ने कमवला ५० कोटींचा गल्ला

प्रवीण तरडेंचा 'देऊळ बंद 2' चित्रपट सध्या जगभरात धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाने ५० कोटींचा टप्पा पार केला आहे. चित्रपटातील डायलॉग, संवाद, गाणी, अभिनय आणि चित्रपट थेट प्रेक्षकांच्या काळजाला भिडले. चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशींनी साकारलेली स्वामींची भूमिका चाहत्यांना आपलीशी वाटली. 'देऊळ बंद २'मध्ये शेतकरी महिला स्वामींची परीक्षा घेताना दिसत आहे. त्यामुळे चित्रपटाची टॅग लाइन 'देऊळ बंद २- आता परीक्षा देवाची' अशी आहे. १२ व्या दिवशी म्हणजे दुसऱ्या सोमवारी प्रवीण तरडेंच्या 'देऊळ बंद २' चित्रपटाने १,१८१ शोजमधून ₹२.६० कोटींचे नेट कमाई केली आहे. यामुळे आतापर्यंतचे भारतातील एकूण ग्रॉस कमाई ५४.८८ कोटी रुपयांवर पोहचली आहे. तर एकूण नेट कमाईने ४६.६५ कोटी रुपये कमावले आहे. 'देऊळ बंद २' चित्रपटातील 'देशात सगळं ओरिजनल, डुप्लिकेट फक्त शेतकरी...', '१० दिवसांत एक जरी आत्महत्या झाली तर माझं देऊळ बंद!', 'मी तुमचं अस्तित्व मान्य करेन पण, तुम्ही आधी परीक्षा द्या...' ही डायलॉग खूप गाजत आहे. चित्रपटात स्वामी शेतकरी महिलेसोबत प्रवास करताना, तिच्याशी बोलताना , शेतात, दऱ्याखोऱ्यांमध्ये, एसटीने फिरताना दिसत आहेत.

## 'ऊंचा लंबा कद' च्या नवीन व्हर्जनचा धुमाकूळ

बॉलिवूडचा लोकप्रिय कॉमेडी चित्रपट 'वेलकम' पुन्हा एकदा चर्चेत आहे. 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटातील 'ऊंचा लंबा कद' हे नवीन गाणे प्रदर्शित झाले आहे. हे गाणे २००७ च्या सुपरहिट चित्रपट 'वेलकम'मधील प्रसिद्ध गाण्याची पुनर्रचित आवृत्ती आहे. यापूर्वी या गाण्यात अक्षय कुमार आणि कतरिना कैफ दिसले होते, पण यावेळी अक्षयसोबत दिशा पटानी दिसत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनल व्हिडिओमध्ये अक्षय कुमार आणि दिशा पटानी या लोकप्रिय गाण्याच्या नव्या व्हर्जनवर नाचताना दिसत आहेत. हा व्हिडिओ 'वेलकम' चित्रपटाच्या आठवणी जागवतो, तसेच चित्रपटातील विनोद आणि गंमतीची झलकही दाखवतो. चाहत्यांना २००७ सालच्या चित्रपटाची आठवण येते.

सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करताना अक्षय कुमारने लिहिले की, १८ वर्षांनंतरही हे गाणे सर्वांचे आवडते आहे. दिशा पटानीसोबतचा हा नवीन प्रवास शेअर करताना त्याने कतरिना कैफची आठवणही काढली. अक्षयने पोस्टमध्ये लिहिले की, तो त्याची 'क्वीन कतरिनाला' कधीही विसरणार नाही. या खास संदेशाने चाहत्यांचेही लक्ष



वेधून घेतले. दिग्दर्शक अनीस बाझमी यांचा 'वेलकम' हा चित्रपट सर्वप्रथम २००७ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रशंसा मिळाली. त्यानंतर २०१५ मध्ये 'वेलकम बॅक' प्रदर्शित झाला. आपल्या उत्साही विनोदी पात्रांमुळे, मार्मिक संवादांमुळे आणि अनोख्या कथानकामुळे ही फ्रँचायझी बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय विनोदी मालिकांपैकी एक बनली आहे.

'वेलकम टू द जंगल'मधून प्रेक्षकांना एका परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव मिळेल. नवीन पात्रे, उत्कंठावर्धक विनोद आणि थोडी ॲक्शन असलेला हा चित्रपट, पुन्हा एकदा हास्य आणि मनोरंजनाचे एक संपूर्ण पॅकेज देण्यास सज्ज आहे.

# कॉमेडी किंग भाऊ कदम यांच्यासोबत झळकणार गौतमी पाटील




अदा आणि लावणीतून प्रेक्षकांना घायाळ करणारी सबसे कातिल गौतमी पाटिलचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. ती बऱ्याचदा कोणत्या न कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. तिचे अनेक साँग अल्बम व्हायरल होतात. आपल्या आगामी प्रोजेक्ट्सबाबत अपडेट्स ती सोशल मीडियात शेअर करत असते. अलिकडेच गौतमी पाटीलने आपल्या आगामी प्रोजेक्टची माहिती दिली आहे. गौतमी आता लवकरच प्रसिद्ध मराठी अभिनेते आणि कॉमेडी किंग भाऊ कदम यांच्यासोबत एका गाण्यात झळकणार आहे.

या गाण्यातील फर्स्ट लूक तिनं इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. 'हिल पोरी हिला' असे गाण्याचे बोल असून, हे गाणे ५ जून रोजी रिलीज होणार आहे. भाऊ कदम यांनी दादा कोंडके यांचा लूक कॅरी केला आहे. तर, गौतमी पाटीलने नऊवारी साडी नेसली आहे. दरम्यान, या गाण्यातून पहिल्यांदाच गौतमी पाटील आणि भाऊ कदम ही नवी कोरी जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

गौतमी पाटीलने या गाण्याचा फर्स्ट लूक शेअर केला आहे. पोस्ट शेअर करत तिने, 'दादांचे सुपरहिट गाणे "हिल पोरी हिला" एका नव्या ढंगात...ज्यांची मी खूप मोठी चाहती आहे, अशा महाराष्ट्राचे लाडके भाऊ कदम यांच्यासोबत हे नबे गाणे', असे तिने कॅप्शन मध्ये म्हटले आहे. सध्या तिच्या आगामी साँग अल्बमची वाट गौतमीचे चाहते करत आहेत.

गौतमीने आपल्या कारकिर्दीत अनेक साँग अल्बममध्ये काम केले आहे. 'सरकार तुम्ही केलंय मार्केट जाम','कृष्ण मुरारी', 'रुपेरी वाळूत' अशा अनेक हिट गाण्यांमध्ये तिने नृत्य सादर केले आहे. साँग अल्बम व्यतिरिक्त गौतमी पाटील 'देवमाणूस' या मालिकेतही झळकली होती.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# शेतकऱ्यांच्या बांधाची काळजी घेणारा आमदार!

## सिद्धार्थ खरातांच्या पुढाकारातून बोरी, अंत्री देशमुखच्या पाणंद रस्त्यांना २३.५३ लाख; शेतमालाच्या वाहतुकीची वाट होणार मोकळी!

**जनसंचलन-मेहकर**

पावसाळ्यात शेतात जाण्याची कसरत आणि काढलेला शेतीमाल बाहेर आणण्याची अडचण कमी करण्यासाठी मेहकर तालुक्यातील बोरी आणि अंत्री देशमुख येथे पाणंद रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद योजनेंतर्गत एकूण २३ लाख ५३ हजार रुपयांच्या या दोन कामांचे भूमिपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते झाले. बोरी येथे गट क्रमांक ८९ मध्ये नारायण कायंदे यांच्या शेतापासून विष्णू कायंदे यांच्या शेतापर्यंत एक हजार मीटरचा पाणंद रस्ता तयार केला जाणार आहे. या कामाचा अंदाजित खर्च १२ लाख ५८ हजार रुपये आहे. अंत्री देशमुख येथे गट क्रमांक ४०३ ते ४३९ दरम्यानच्या पाणंद रस्त्यासाठी १० लाख ९५ हजार रुपये मंजूर झाले आहेत. या रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यावर ट्रॅक्टर आणि इतर वाहने शेतापर्यंत नेणे सोपे होईल. पावसाळ्यातील ये-जा सुलभ होण्यासोबतच शेतीमालाच्या वाहतुकीत शेतकऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचण्यास मदत होईल. पाणंद रस्ता समितीचे अध्यक्ष असलेल्या आमदार खरात यांच्या पुढाकारातून ही कामे हाती घेण्यात आली आहेत. भूमिपूजनाला समितीचे सहअध्यक्ष शिवशंकर गायकवाड, राजगुरू सर, गजानन निकस, अमोल बोरे, गणेश गावंडे, नंदकिशोर देशमुख, कडूबा शेजुळ, गटविकास अधिकारी दिनकर खरात, नायब तहसीलदार दीपक देशमुख आणि सहायक गटविकास अधिकारी संदीप मेटांगळे उपस्थित होते. यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि ग्रामस्थही उपस्थित होते.




# निमगावातून तुपकरांनी मांडला कमिशनचा हिशेब

## आमच्याकडून १० टक्के घ्या, शेतकऱ्यांना हेक्टरी लाख द्या

**जनसंचलन-नांदुरा**


आमच्याकडून १० टक्के कमिशन घ्या पण आमच्या शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत मिळवून द्या. त्यासाठी हेक्टरची मर्यादाही घालू नका, अशा शब्दांत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सत्ताधाऱ्यांना खोचक टोला लगावला. दुष्काळ संघर्ष यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, १५ नोव्हेंबरच्या रात्री नांदुरा तालुक्यातील निमगाव येथे झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या मदतीत कमिशन मिळत नसल्याने सत्ताधारी नेते त्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवत नाहीत, असा आरोप तुपकरांनी केला. सकाळी माकनेर, रात्री निमगावात शेतकऱ्यांची गर्दी! १४ नोव्हेंबरला मलकापूर येथून निघालेल्या यात्रेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी नऊ वाजता माकनेरमधून झाली. काटी, विटाळी, सिरसोडी, चांदूरबिस्वा, दिघी, वडनेर आणि अलमपूरमार्गे यात्रा रात्री निमगावात पोहोचली. गावोगावी शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन नागरिक आणि महिलांनी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. दुष्काळामुळे झालेली आर्थिक कोंडी, कोसळलेले शेतमालाचे भाव, पीक नुकसान आणि वाढता कर्जबोजा या अडचणी शेतकऱ्यांनी तुपकरांसमोर मांडल्या. रात्री उशिरा झालेल्या निमगावच्या सभेलाही शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाच हजारांची मदत नको, हक्काची नुकसानभरपाई द्या!फ दुष्काळाने झालेल्या नुकसानीपुढे पाच हजारांची मदत अपुरी असल्याचे सांगत तुपकरांनी क्षेत्रमर्यादेशिवाय हेक्टरी एक लाख रुपयांची मागणी लावून धरली. संपूर्ण कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान, कापूस आणि सोयाबीनला योग्य भाव, पीकविम्याची पूर्ण नुकसानभरपाई आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांची सक्तीची कर्जवसुली थांबवण्याची मागणीही त्यांनी केली. मेंढपाळांच्या आंतरजिल्हा चराईवरील निर्बंध हटवावेत आणि दुष्काळग्रस्त पशुपालकांसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी मांडली. आता ४ डिसेंबरला बुलढाण्यात ङ्गएल्गारफ! जिल्ह्यातील तेराही तालुक्यांतून मार्गक्रमण करणाऱ्या यात्रेत गावोगावी शेतकऱ्यांशी संवाद आणि कॉर्नर सभा सुरू आहेत. या भेटींमधून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जात आहे. ४ डिसेंबरला बुलढाण्यात होणाऱ्या एल्गार महामोर्चासाठी जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी एकत्र यावे, असे आवाहन तुपकरांनी निमगावच्या सभेत केले



# राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेचा दिमाखदार समारोप; महाराष्ट्राच्या तीन संघांची घोषणा

**जनसंचलन-बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने तसेच महाराष्ट्र हॉकी आणि बुलढाणा हॉकी असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेचा दिमाखदार समारोप झाला. दि. १२ ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे झालेल्या या स्पर्धेत राज्यातील विविध विभागांतील खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहकार विद्या मंदिर येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात पुणे विभागाने प्रथम, कोल्हापूर विभागाने द्वितीय, तर मुंबई विभागाने तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात कोल्हापूर विभागाने प्रथम, पुणे विभागाने द्वितीय, तर मुंबई विभागाने तृतीय क्रमांक मिळविला. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात मिशन लक्षवेध, पुणे यांनी प्रथम, कोल्हापूर विभागाने द्वितीय, तर क्रीडा प्रबोधिनीने तृतीय क्रमांक मिळविला. मुलींच्या गटात कोल्हापूर विभागाने प्रथम, मुंबई विभागाने द्वितीय, तर नागपूर विभागाने तृतीय क्रमांक पटकावला. समारोपीय कार्यक्रमाला सहकार विद्या मंदिरचे प्राचार्य अलगर सामी, ऑलिम्पिक खेळाडू अजित लाक्रा, जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, प्रशांत मंडले, बुलढाणा जिल्हा हॉकी संघटनेचे सचिव प्रकाश खेत्रे, सेवानिवृत्त तालुका क्रीडा अधिकारी उमेश बडवे, सुशील सुर्वे, राज्य क्रीडा मार्गदर्शक वैशाली सुळ, आरती हळगीळ तसेच निवड समिती सदस्य सय्यद आबिद यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते १७ वर्षांखालील मुला-मुलींच्या विजेत्या व उपविजेत्या संघांतील खेळाडूंना पदके व चषक देऊन गौरविण्यात आले.



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# उतावळी प्रकल्पाचे पाणी शेतीसाठी सोडले...!

## सिद्धार्थ खरात यांच्या उपस्थितीत सिंचनाचा शुभारंभ; १७ किलोमीटर कालव्याद्वारे शेतांना मिळणार पाणी!

**जनसंचलन-मेहकर**

मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी! देऊळगाव साखरशा येथील उतावळी मध्यम प्रकल्पातून शेतीसाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या उपस्थितीत जलसिंचनाचा शुभारंभ करण्यात आला. या निर्णयामुळे देऊळगाव साखरशा आणि नायगाव देशमुख परिसरातील शेतकऱ्यांच्या उर्वरित पिकांना मोठा आधार मिळणार आहे.उतावळी प्रकल्पाची एकूण पाणी साठवण क्षमता १९ दशलक्ष घनमीटर असून, सध्या धरणात १६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध आहे. ३१ ऑगस्ट २०२७ च्या नियोजनानुसार आवश्यक पाणीसाठा राखून सुमारे ५ दशलक्ष घनमीटर पाणी शेतीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तब्बल १७ किलोमीटर लांबीच्या कालव्याद्वारे हे पाणी शेतांपर्यंत पोहोचणार आहे. कालव्यांची अपूर्ण कामे पुढील दोन ते तीन दिवसांत पूर्ण करण्याच्या सूचना आमदार खरात यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांनी ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर करून पाण्याचा



काटकसरीने उपयोग करावा, असे आवाहन केले. शेतीसाठी पाणी सोडतानाच गावाच्या पिण्याच्या पाण्याचेही स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे.

# नवजात बालक अर्भकाचा मृतदेह आढळला; अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**




शहरातील धाड रोड परिसरातील टीबी तलावाजवळ एका अनोळखी नवजात बालक अर्भकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना १५ नोव्हेंबर २०२६ रोजी उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार, टीबी तलाव परिसरातील तलावाच्या काठाजवळ अंदाजे एक ते दोन दिवस वयाच्या नवजात बालक अर्भकाचा मृतदेह आढळून आला. अज्ञात व्यक्तीने नवजात बालकाचा जन्म लपविण्याच्या उद्देशाने कायदेशीर सोपस्कार न करता त्याचा मृतदेह अत्यंत गुप्तपणे तलाव परिसरात टाकून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. या प्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात अप. क्र. ११३०/२०२६, भारतीय न्याय संहितेच्या कलम ९४ अन्वये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठांच्या आदेशानुसार सहायक पोलीस फौजदार नामदेव खवले (ब.नं. १०३७) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सदर नवजात अर्भकाच्या नातेवाईकांचा तसेच मृतदेहाची विल्हेवाट लावणाऱ्या संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# दिवाळीपूर्वीच ४ लाख ३० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजारांची अग्रिम मदत जमा

## बुलढाणा जिल्ह्यात २१५ कोटी ८ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार

**जनसंचलन-बुलढाणा**

यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला. कमी पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम मदत देण्याचा निर्णय घेतला. शासनाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करत दिवाळीपूर्वीच जिल्ह्यातील तब्बल ४ लाख ३० हजार १५३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत २१५ कोटी ८ लाख रुपयांची मदत जमा करण्यात आली आहे. ऐन सणासुदीच्या काळात मिळालेल्या या आर्थिक मदतीमुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यातील तालुकानिहाय आकडेवारीनुसार, चिखली तालुक्यात सर्वाधिक ५२ हजार ९६९ शेतकऱ्यांना २६ कोटी ४८ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. त्याखालोखाल मेहकर तालुक्यातील ४७ हजार ७३२ शेतकऱ्यांना २३ कोटी ८७ लाख रुपये, सिंदखेड राजा तालुक्यातील ४२ हजार ७८ शेतकऱ्यांना २१ कोटी ४ लाख रुपये, खामगाव तालुक्यातील ४० हजार २६ शेतकऱ्यांना २० कोटी १ लाख रुपये, तर बुलढाणा तालुक्यातील ३६ हजार ३३ शेतकऱ्यांना १८ कोटी २ लाख रुपयांचे अर्थसाहाय्य वितरित करण्यात आले आहे. तसेच लोणार तालुक्यातील ३४ हजार ३८ शेतकऱ्यांना १७ कोटी २ लाख रुपये, मोताळा तालुक्यातील ३१ हजार ८१९ शेतकऱ्यांना १५ कोटी ९१ लाख रुपये, नांदुरा तालुक्यातील २७ हजार ३८८ शेतकऱ्यांना १३ कोटी ६९ लाख रुपये, तर संग्रामपूर तालुक्यातील २५ हजार ८५७ शेतकऱ्यांना १२ कोटी ९३ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील २४ हजार ७४८ शेतकऱ्यांना १२ कोटी ३७ लाख रुपये, मलकापूर तालुक्यातील २२ हजार ७५५ शेतकऱ्यांना ११ कोटी ३८ लाख रुपये, शेगाव तालुक्यातील २२ हजार ११७ शेतकऱ्यांना ११ कोटी ६ लाख रुपये, तर जळगाव जामोद तालुक्यातील २२ हजार ५९३ शेतकऱ्यांना ११ कोटी ३० लाख रुपयांची मदत वितरित करण्यात आली आहे. अशा प्रकारे जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांतील एकूण ४ लाख ३० हजार १५३ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांत २१५ कोटी ८ लाख रुपयांची अग्रिम मदत जमा करण्यात आली आहे. कमी पावसामुळे खरीप हंगामात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासनाने उपलब्ध करून दिलेली ही मदत शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात उपयोगी ठरली आहे. दिवाळीपूर्वीच मदतीची रक्कम खात्यात जमा झाल्याने सणासुदीच्या खर्चासह दैनंदिन गरजा आणि शेतीशी संबंधित खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक हातभार मिळाला आहे.

# दिव्यांग वधू-वर परिचय मेळाव्याचे लोणार येथे आयोजन...

**जनसंचलन/ लोणार**

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईड बुलडाणा व बुलडाणा अर्बन यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग (अंध, मुकबधीर, अस्थिव्यंग,) वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन मंगळवार दिनांक ०१ डिसेंबर २०२६ रोजी श्रीमंगल कार्यालय, लोणार येथे सकाळी १० ते ४ वाजे आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बुलडाणा अर्बनचे संस्थापक, अध्यक्ष राधेश्याम चांडक, अध्यक्ष नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंड बुलडाणा, कार्यक्रमाचे उदघाटक मा.श्री प्रवीण कुमार देवरे (प्रा.से.) असोसिएशन बुलडाणा, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी. डॉ.भालचंद्र चव्हाण, जि.प. , मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बुलडाणा, डॉ. दत्तात्रय बिराजदार साहेब, शल्यचिकीत्सक जिल्हा सामान्य बुलडाणा, मा. मनोज मेरत, सहा. समाज कल्याण विभाग, बुलडाणा, मानस फौन्डेशनचे अध्यक्ष मा.श्री डी. एस. लहाने, नेशनल असोसिएशन फॉर द ब्लाड बुलडाणा उपाध्यक्ष श्रीकृष्ण आत्माराम म्हस्के, सचिव डॉ. वसंतराव चिंचोले, कोषाध्यक्ष श्री दिलीप नागरिक तसेच सभासद, सदस्य, आदि मान्यवर उपस्थित मेळावा आयोजित केला आहे. सदर मेळाव्यात लग्न करण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांगांशी लग्न जुळेल अशा दिव्यांग वधू वरास दोघा पैकी एकास बुलडाणा अर्बन यांच्या तर्फे नौकरी देण्याचे प्रयत्न करण्यात येईल. तसेच विधवा घटस्फोटीत व सर्वसाधारण व्यक्ती जे दिव्यांग व्यक्तीसोबत विवाह करू इच्छितात त्यांनी देखील आपली नोंदणी करून मेळाव्यास हजर राहावे.

संबंधित लाभधारक मेळाव्यास येतांना दिव्यांग प्रमाणपत्र, आधारकार्ड, राशनकार्ड, दोन पासपोर्ट साईज फोटो किंवा (जे काही कागदपत्रे उपलब्ध




असतील) मेळाव्याच्या दिवशी सोबत घेऊन यावे.जेणे करून आपले नाव नोंदणी करण्यात येईल. तसेच माहिती पत्र, परिचय पत्र, खालील ठिकाणी उपलब्ध असतील ते भरून खालील ठिकाणी यावे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईड बुलडाणा, कार्यालय गांधी भवन, जयस्तंभ चौक बुलडाणा, बुलडाणा जिल्ह्यातील बुलडाणा अर्बन संस्थेचे सर्व शाखा, सहकार विद्या मंदिराच्या सर्व शाखा, तसेच शिवसाई पतसंस्थेचे सर्व शाखा आणि नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईड बुलडाणा ईमेल:-९१. वर पाठवू शकतात. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळींचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२८७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळींचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८